राष्ट्रीय सेवा योजना
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक,
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८

राष्ट्रीय सेवा योजना

नियमित उपक्रम अहवाल

मार्च २०२३

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२३

१. मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८
२. प्राचार्य डॉ.एस.के.कुशारे, मो.९७६६०४४१४५
३. कार्यक्रम अधिकारी डॉ.आर.ए.आहिरे , मो.९८८१९७८१०९
४. स्वयंसेवक एकूण संख्या (एकूण युनिट)- २५० दोनशे पन्नास
५. कार्यशाळा शिबीर व्याख्याने इ. आयोजनात सहभागी संस्था
    १. नंदिनी संवर्धन मोहीम नाशिक
    २. ग्रामपंचायत गिरणारे
    ३. जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग नाशिक
    ४. रेडिओ एफ एम बाईक रायडर्स
    ५. नाशिक जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,**
**उत्तमनगर सिडको, नाशिक- ४२२००८**

---

# नियमित उपक्रम अहवाल २०२३ -२०२३

(रा.से.यो.वार्षिक नियमित उपक्रम अहवाल २०२३-२०२३)

**माहे जून व जूलै २०२२–**

शैक्षणिक वर्ष २०२२ -२०२३ मधील रा.से.यो. उपक्रमांची सुरुवात रा.से.यो. प्रवेशाद्वारे महाविद्यालयात करण्यात आली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वयंसेवक कु. ज्योत्स्ना कदम, श्वेता नवले, प्रियंका काटे, अर्चनाकुमारी सिंग, यश तावडे यांनी दि. २३ जून २०२२ ते दि. १० जुलै २०२२ या कालावधीत पुणे ते पंढरपूर वारी पंढरीची - वारी लोकशाहीची या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदविला.

**माहे ऑगस्ट २०२२–**

दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी आझादी का अमृत महोस्तव अंतर्गत सेल्फी विथ तिरंगा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कुटुंबातील सदस्य व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

दि. १४ ऑगस्ट २०२२ रोजी आझादी का अमृत महोस्तव अंतर्गत निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, जनजागृती रॅली इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात रा.से.योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

दि.२५ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मविप्र समाजाचे डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने महविद्यालयात रक्तदान शिबीर घेण्यात आले सदर उपक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

दि.२७ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नाशिक जिल्हा रुग्णालय (सिव्हील) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिन उपक्रमा अंतर्गत समुपदेशक श्रीमती योगिता पवार यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. तसेच एकूण ३४ विद्यार्थ्यांची एच.आय.व्ही. चाचणी करण्यात आली.

**माहे सप्टेंबर २०२२–**

दि. ९ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नाशिक महानगरपालिका आयोजित 'गणेश मूर्ती दान' या उपक्रमात सहभाग नोंदवून गणेश विसर्जनाच्या दिवशी गणेश मूर्तींचे विसर्जन न करता ती दान करावी पर्यावरणाच्या संवर्धन करावे. याची जनजागृती करत, गणेश मूर्ती संकलनामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवकांनी दर वर्षी प्रमाणे आपले योगदान दिले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयचे सातत्य आणि केलेल्या उत्कृष्ट कार्यामुळे महाविद्यालयाचे कौतुक करण्यात आले.

दि. १५ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व रेड एफ एम यांच्या संयुक्त विद्यमाने Bike Riders या विषयावर प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली.

दि. २० सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नाशिक जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आधारकार्ड मतदार ओळखपत्र जोडणी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न कार्यशाळेसाठी उपजिल्हाधिकारी डॉ. स्वाती थवील व नायब तहसीलदार श्री. राजेश आहिरे नाशिक जिल्ह्यातील एकूण २५३ कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी जिल्हास्तरीय SRD-NRD निवड चाचणी शिबिर सिडको महाविद्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील कु.श्वेता नवले, कु.प्रियंका काटे या स्वयंसेविकानी सहभाग नोंदविला.

या निवड चाचणी शिबिरात निवड होऊन दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी विद्यापीठ/ राज्यस्तरीय निवड चाचणी शिबिरात कु.श्वेता नवले, कु.प्रियंका काटे या स्वयंसेविकानी सहभाग नोंदविला.विद्यापीठाच्यावतीने कु. ज्योत्सना कदम हिने समुपदेशक व जिल्हा समन्वयक डॉ. रविंद्र आहिरे यांनी परीक्षक म्हणून काम पहिले.

**माहे ऑक्टोबर २०२२–**

दि. २ ऑक्टोबर २०२२ या दरम्यान राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त स्वच्छता हीच सेवा या उपक्रम अंतर्गत महाविद्यालयात विविध कार्याक्रमचे आयोजन करण्यात आले. त्या राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने स्वच्छता जनजागृती, प्लास्टिक मुक्त भारत, निरोगी भारत इत्यादी विषयावर उपक्रम राबविण्यात आले.

२ ऑक्टोबर २०२२ रोजी महात्मा गांधीजींची १५० वी जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली, या प्रसंगी प्रा. सोमनाथ घुले सरांनी मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वच्छतेविषयी माहिती सांगून महात्मा गांधीजींची जयंती संपन्न झाली. नंदिनी नदी, उंटवाडी येथे स्वच्छता मोहीम राबविली परिसरात प्लास्टिक, घनकचरा संकलन करून विल्हेवाट करण्यात आली या उपक्रमात निसर्ग संवर्धन संस्था, नाशिक महानगरपालिका, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी ओम साई वेलफेअर असोसिएशन फॉर द ब्लाइंड आयोजित वर्ल्ड ब्लाइंड डे पांढरी काठी उपक्रमात डॉ. रविंद्र आहिरे व रासेयो स्वयंसेवक यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.

३१ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला या दिवशी विद्यार्थ्यांनी एकता दौडमध्ये सहभाग घेऊन एकतेची शपथ घेतली.

**माहे नोव्हेंबर २०२२–**

दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागच्या वतीने संविधान पत्रिका वाचन व डॉ.गणेश रोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**माहे डिसेंबर २०२२–**

दि.१ डिसेंबर २०२२ रोजी नाशिक जिल्हा रुग्णालय (सिव्हील),जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग नाशिक यांच्या वतीने पोस्टर व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदविला.

**माहे जानेवारी २०२३–**

३ जानेवारी २०२३ रोजी सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजामाता यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी प्रा.सोमनाथ घुले सर यांनी मार्गदर्शन केले.

दि. २५ जानेवारी २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नाशिक जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला त्याप्रसंगी नाशिक

निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. भीमराज दराडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व मतदान जनजागृतीची शपथ देण्यात आली.

**माहे फेब्रुवारी २०२३–**

दि. ०८ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२३ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात १२५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन पार पडले व १४ फेब्रुवारी २०२३ रोजी समारोप करण्यात आला.

दि. २० फेब्रुवारी २०२३ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नाशिक पर्यटन संचनालय कार्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शिव जन्मोस्तव निमित्ताने शिवनेरी सहल उपक्रमात ५० स्वयंसेवकांनी व कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग नोंदविला.

**माहे मार्च २०२३–**

९ मार्च २०२३ रोजी 'जागतिक महिला दिन्नानिमित्त' महाविद्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वर्षभर आयोजित या नियमित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी डॉ.रविंद्र आहिरे, प्रा. वर्षा शिरोरे , प्रा शुभम गव्हाणेयांनी उत्सफुर्तपणे सहभाग घेतला तसेच प्रा. सोमनाथ घुले सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले, या सर्व नियमित कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. एस. के. कुशारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्वयंसेवकांच्या उत्तम प्रतिसादामुळे सन २०२२-२०२३ वर्षातील सर्व नियमित कार्यक्रम उत्तमरीतीने पार पडले.

शर्करा तपासणी एकूण सहभागी संख्या- ११०
एच.आय.व्ही. तपासणी एकूण सहभागी संख्या- ४५
वृक्षरोपण एकूण संख्या- १००
सहभागी स्वयंसेवक- २५०

**(डॉ.रविंद्र आहिरे )**
**रा.से.यो**
**कार्यक्रम अधिकारी**

**(डॉ.एस.के.कुशारे)**
**प्राचार्य**